# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

File

३ , महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी- २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७
E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

ई-मेलद्वारे/स्पीड पोस्टद्वारे

क्रमांक : १८/तशिसं/खातेबदल/डीबीटी/२०१९/ ५६३
दिनांक : २१/१२/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय : संस्थांचे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल करण्यात आलेले बँक तपशिल मंजूर करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्यांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना पूर्वापारपध्दतीनुसार विविध विभागांमार्फत राबविण्यात येत होत्या. सदर योजनांमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने व योजनांचा लाभ लाभार्थ्यांच्या थेट खात्यामध्ये जाण्याच्या दृष्टीने केंद्र शासनातर्फे डी.बी.टी. पोर्टल संकल्पना राबविली. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासनाकडूनही सन २०१८-१९ मध्ये ही संकल्पना राबविण्यात आली.

सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडून, **आपले सरकार महाडीबीटी पोर्टल** (संकेतस्थळ: **https://mahadbtmahait.gov.in** ) बनविण्यात आले.

DBT अंतर्गत योजनांचा लाभ संस्था/विद्यार्थ्यांना DBT पोर्टल मार्फत देण्यात येतो. DBT पोर्टलवर संस्थाचा लाभ संस्थांना मिळण्यासाठी प्राचार्य यांच्याकडून संस्थेच्या प्रोफाईल लॉगीनमध्ये बँक खात्याची संपूर्ण माहिती भरण्यात येते. बँक खात्यामध्ये संबंधीत संस्थांची रक्कम DBT पोर्टल मार्फत त्यांच्या खात्यात पाठविण्यात येते. तसेच बँक तपशीलमध्ये ऑनलाईनबाबत बदल करण्याचे अधिकार देखील संस्थांच्या प्राचार्यांना त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये देण्यात आलेला आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाअंतर्गत येणाऱ्या ज्या संस्थांकडून पुर्वीच्या बँक तपशिलात बदल करून DBT पोर्टलवर नवीन बँक खात्याचा तपशील भरण्यात आलेला आहे त्या बँक तपशिलात मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार डीआयटी कडून या संचालनालयाला ऑनलाईनरित्या देण्यात आलेले आहेत.

. संस्थांना बँक खात्यामध्ये जर बदल करावयाचे असतील तर त्या संस्थांनी आपल्या लॉगीन आयडी चा वापर करून DBT पोर्टलवर ऑनलाइनरित्या बँक तपशिल भरून मंजूर करण्यासाठी संस्थांच्या लेटर हेडवर खालील तक्त्यामध्ये संस्थाच्या पूर्वीच्या बँक खात्याचा तपशिल व मंजूर/नामंजूर करण्यासाठी संस्थाकडून DBT पोर्टल वर ऑनलाइनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल बदल करायच्या कारणासह संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयार्फत जमा करावे. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय त्यांच्या शिफारशिसह संस्थेचा प्रस्ताव संचालनालयास पाठविल्यानंतर ते मंजूर/नामंजूर हे संचालनालय स्तारावर करण्यात येईल. सर्व विभागीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त येणाऱ्या संस्थांना याबाबत तसे कळविण्यात यावे.

**संस्थाच्या DBT पोर्टलवर पूर्वीच्या बँक खात्याचा तपशिल**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी. कोड | बँकेचा खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**मंजूरीसाठी संस्थाकडून DBT पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी. कोड | बँकेचा खाते क्र. | पुर्वीच्या खात्यात बदल करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/Mahadbt/2019/ ८1039
दिनांक :- 24 DEC 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

**शैक्षणिक वर्ष** 2018-19 करीता या विभागांतर्गत येत असलेल्या संस्थांना बँक खात्यामध्ये जर बदल करावयाचे असतील तर त्या संस्थांनी, दिलेल्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल तात्काळ या कार्यालयांच्या ronagpur@dtemaharashtra.gov.in वर पाठविण्यांत यावी.

(डॉ. राम निबुदे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,नागपूर.